**MANAGEMENT COUNCIL**
**22nd JUNE, 2023**

विषय क्र.७१- दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर सन २०२०-२१ चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) ऑनलाइन पध्दतीने भरणेत आलेला वार्षिक अहवाल माहितीसाठी.

(सोबत CIQA वार्षिक अहवालाची प्रत जोडली आहे.)

(टिपणी:विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दि. ०६ मे २०२३ रोजीच्या ई-मेलनुसार UGC DEB वेब पोर्टलवर Centre for Internal Quality Assurance (CIQA) चा सन २०२०-२१ व सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल सादर करण्याची तारीख दि. ३१ मे २०२३ पर्यंत असल्याचे कळविले होते.

दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राचा Centre for Internal Quality Assurance (CIQA) चा सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल दि. २४/०५/२०२३ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेब पोर्टलवर अपलोड करणेत आला आहे. सदरचा सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल पोर्टलवर अपलोड केलेनंतर सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल वेब पोर्टलवर अपलोड करत असता पोर्टलवरील प्रस्तावामध्ये सन २०२१-२२ चा पर्याय उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. तद्नंतर सन २०२१-२२ चा पर्याय उपलब्ध नसलेबाबतची माहिती घेणेकरिता विद्यापीठ अनुदान आयोग कार्यालयातील विविध दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधला असता योग्य ती माहिती प्राप्त झाली नाही. त्याअनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगास दि. २४/०५/२०२३ रोजी ई-मेलद्वारे कळविण्यात आले. सदरच्या ई-मेलवर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दि. २५/०५/२०२३ व दि. २६/०५/२०२३ रोजीच्या ई-मेलनुसार Have you got the recognition for ODL programmes in २०२१-२२ AY? If yes, then share the recommendation letter with us. अशी विचारणा करणेत आली. त्यास दि. २५/०५/२०२३ व दि. २६/०५/२०२३ रोजी दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातील दूरशिक्षण अभ्यासक्रमांना सन २०२१-२२ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता प्राप्त झाली नसल्याचे कळविण्यात आले. तसेच दि.२९/०५/२०२३ रोजीही स्मरणपत्र ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहे. तथापि त्यासही विद्यापीठ अनुदान आयोगाकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

दि. ३०/०५/२०२३ रोजी Shri. Vinod Singh Yadav, Deputy Secretary, UGC यांचेशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल अपलोड करणेमध्ये अडचण येत असल्याचे तसेच विद्यापीठाकडून करणेत आलेल्या ई-मेलबाबत माहिती दिली. यावर Shri. Vinod Singh Yadav यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण अभ्यासक्रमांना सन २०२१-२२ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांची मान्यता नसलेने वेब पोर्टलवर सन २०२१-२२ चा पर्याय उपलब्ध झाला नसलेचे तसेच सदरची माहिती विद्यापीठामार्फत अपलोड करता येणार नसल्याचे सांगितले. यामुळे दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राचा सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल अपलोड करणेची आवश्यकता रहात नाही.

**MANAGEMENT COUNCIL**
**22nd JUNE, 2023**

सबब, दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर सन २०२०-२१ चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) ऑनलाइन पध्दतीने भरणेत आलेला वार्षिक अहवाल माहितीसाठी.)

**ठराव : दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर सन २०२०-२१ चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) ऑनलाइन पध्दतीने भरणेत आलेल्या वार्षिक अहवालाची नोंद घेण्यात आली.**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सभा व निवडणूका विभाग
Shivaji University, Kolhapur